म.सं.कौ.हिं.का.अर्ज २२८/२०२४
वैष्णवी मोरे वि. किरण मोरे

## निशाणी २० वर आदेश

१) गैरअर्जदार यांनी सदरचा अर्ज हा दि.१७.०९.२०२५ रोजी गैरअर्जदार यांच्या विरुध्द झालेला ' एक-तर्फा प्रकरण चालविण्याचा आदेश ' रद्द करण्या करीता दाखल केला आहे.

२) सदर अर्जात गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की, सदर अर्जात गैरअर्जदार यांना समन्स मिळाल्यानंतर गैरअर्जदार हे न्यायालयात हजर होवून त्यांच्या वतीने वकिल नेमलेले होते. प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार हे कोर्टात हजर झाल्यानंतर गैरअर्जदार यांना त्यांच्या वकिलांकडून सदरील प्रकरणाची आवश्यक माहिती मिळालेली नाही. त्यानंतर गैरअर्जदार यांनी त्यांच्या वकीलांशी वारंवार फोन करुन संपर्क केला असता त्यांचाशी संपर्क झाला नाही. त्यामुळे न्यायालयाने दि. १७/०९/२०२५ रोजी गैरअर्जदार यांच्या विरुध्द एकतर्फा हुकूम पारित केलेला आहे.

३) गैरअर्जदार यांनी पुढे असे कथन करतात की, त्यानंतर गैरअर्जदार यांनी विधिज्ञ वर्षा गागरे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत नवीन वकिलपत्र दि. ०४/१२/२०२५ रोजी न्यायालयात दाखल केलेले आहे. गैरअर्जदार हे सरकारी कर्मचारी असून त्यांना त्यांचे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे वांरवार बाहेरच्या ठिकाणी डयुटी निमित्त जावे लागते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात त्यांचे वकिलांना गैरअर्जदार वेळेत आवश्यक माहिती व कागदपत्रे देवू शकले नाहीत. प्रस्तुत अर्जाच्या न्यायनिणर्यकामी गैरअर्जदार यांचे म्हणणे न्यायालयात रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जाचा निकाल हा गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यासाठी गैरअर्जदार यांना लेखी म्हणणे दाखल करणे गरजेचे आहे. गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केल्यास अर्जदाराचे कुठलेही नुकसान होणार नाही किंवा त्यांच्यावर अन्याय होणार नाही. याउलट, म्हणणे दाखल न करुन घेतल्यास गैरअर्जदार यांचे कधीही भरुन न येणारे असे आर्थिक नुकसान होणार आहे. सबब,

गैरअर्जदार यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

४) सदर अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल केले व अर्जातील कथने नाकारली. अर्जदाराने सदरचा अर्ज दि. १४/११/२०२४ रोजी दाखल केलेला असून गैरअर्जदार हे तेव्हापासून सदरच्या प्रकरणात हजर राहुन मुदत घेत आहेत. न्यायालयाने वेळोवेळी गैरअर्जदार यास संधी देवून सुध्दा त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. अर्जदाराने नि. ५ वर युक्तीवाद केल्यानंतर सदरचा खोटया आशयाचा अर्ज केलेला असुन तो नामंजुर होण्यास पात्र आहे. परंतु अर्जदारास सदरचे प्रकरण गुणदोषावर चालवायचे असल्याने जर गैरअर्जदाराचा अर्ज मंजुर केलातर गैरअर्जदार यांचेवर जास्त खर्चाची रक्कम देण्याचा आदेश व्हावा. सदर अर्जातील कारण चुकीचे व खोटे आहे, तरी सदरचा अर्ज खर्चासहित नामंजूर करणेत यावा.

५) अर्ज व त्यावरील म्हणणे इत्यादीचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार हे नोटीस मिळूनही सदर प्रकरणात वेळेत हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरण दाखल केल्यापासुन सन २०२४ पासून आजपर्यंत विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण हे महिलांचे संरक्षण कौटूंबिक हिंसाचार कायद्यान्वये दाखल केले असल्याने व सदर प्रकरणात अंतर्गत पोटगी मिळणे बाबत अर्ज दाखल असल्यामुळे गैरअर्जदार हजर न झाल्यामुळे अर्जदार यांना त्रास झालेला आहे. परंतू, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता गैरअर्जदार यांनी हजर होवून त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे हे न्यायाच्या दृष्टीने संयुक्तीक आहे. तसेच सदर प्रकरणाचा अंतिम-गुणदोंषावर निकाल होण्यासाठी गैरअर्जदार यांना सदर प्रकरणात हजर होवून म्हणणे देणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय त्तवाचा, सदर प्रकरणात झालेला विलंब, अर्जदार यांना झालेला त्रास इत्यादी विचारात घेता गैरअर्जदार यांचा सदरचा अर्ज हा खर्च रक्कम रुपये ५००/- देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) गैरअर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) गैरअर्जदार यांच्या विरुध्द झालेला एक-तर्फा प्रकरण चालविण्याबाबतचा आदेश ५००/- रुपये अर्जदार यांना देण्याच्या अटीवर खर्चासह मंजूर करण्यात येतो.

३) गैरअर्जदार यांना निर्देश देण्यात येतो की, गैरअर्जदार यांनी सदरचा खर्च पुढील तारखेस अर्जदार यांना द्यावा.

४) गैरअर्जदार यांनी म्हणणे अर्जदार यांना रुपये ५००/- खर्च (कॉस्ट) दिल्यानंतर स्विकारण्यात येईल.

५) गैरअर्जदार यांनी या अर्जासोबत नि.क्र. १ व नि.क्र. ५ च्या अनुषंगाने असणारे त्यांचे म्हणणे प्रकरणात दाखल केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी पुढील तारखेस सदर म्हणणे विनाविलंब अभिलेखावर दाखल करावे.

६) दोन्ही पक्षांना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी पुढील तारेखस अंतरीम अर्जावर सुनावणी घ्यावी.

७) अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

AUTI GAURI GHANASHAM

Digitally signed by AUTI GAURI GHANASHAM
Date: 2025.12.29 17:03:35 +0530

( जी.जी.औटी)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ६, पिंपरी.

दि.२९.१२.२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are the same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | B. S. Jamkhandi(Karnikar) [Steno III] |
| Name of the Court | :- | G.G.Auti<br>6th Jt. J.M.F.C., Pimpri Pune. |
| Date | :- | 29.12.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 29.12.2025 |
| Order uploaded on | :- | 29.12.2025 |